परिपत्रक नं.30 (अकौंट विभाग) रयत शिक्षण संस्था, सातारा

रयत सेवक कुटुंब कल्याण योजना

दिनांक - ११/११/२०२४

सर्वश्री शाखाप्रमुख व सेवक वर्ग,
रयत शिक्षण संस्था, सातारा

**विषय- रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या सुधारित स्वरूपासंबंधी**

रयत शिक्षण संस्थेच्या, रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेमध्ये आमूलाग्र बदल करण्यात आलेला आहे. रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या सभासदांना चांगल्या रीतीने मदत मिळावी यासाठी सदर योजना सुधारित स्वरूपात तयार करण्यात आलेली आहे. या अगोदर सदर योजनेचा आवाका आजच्या दृष्टीने खूपच मर्यादित असल्यामुळे असा बदल अपेक्षित होता. सुधारित रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची अंमलबजावणी एप्रिल २०१७ पासून झालेली आहे. या सुधारित योजनेच्या कार्यवाहीबाबत आमचेकडील परिपत्रक क्र. १ दि. २२/०३/२०१७ अन्वये सर्व शाखांना कळविण्यात आलेले आहे. मात्र अनेक शाखांकडून अपेक्षेप्रमाणे त्याविषयांची पूर्तता झालेली दिसून येत नाही. तरी सदरची पूर्तता सर्व शाखांनी पूर्ण करुन घ्यावयाची आहे. त्याची सर्व शाखाप्रमुखांनी मुदतीत अंमलबजावणी करावी.

**रयत सेवक कुटुंब कल्याण योजना, रयत शिक्षण संस्था, सातारा**

१) सुधारित रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची प्रत्येक सभासदासाठी वर्गणी रु. ५,०००/- असून सदरची वर्गणी सन २०२४-२५ या वर्षात एक रकमी अथवा जास्तीत जास्त पाच समान हप्त्यात भरावयाची आहे. ही वर्गणी रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या कार्यालयाकडे चेक ने पाठविण्यात यावी.

२) सेवकाकडून रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची एकूण वर्गणी रु. ५,०००/- योजनेकडे जमा झाल्यानंतर त्या सेवकाने सुधारित योजनेप्रमाणे पुन्हा वर्गणी पाठविण्याची आवश्यकता नाही.

३) रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या प्रत्येक सभासदाची सध्या जमा झालेली रक्कम सुधारित रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेच्या वर्गणीमध्ये समाविष्ट केली जाईल. अशा सेवकांनी वर्गणीची उरणारी रक्कम (रु. ५,०००/- साठी कमी पडणारी) २०२४-२५ या वर्षात एक रकमी किंवा जास्तीत जास्त समान पाच हप्त्यांमध्ये पूर्ण करावयाची आहे. जुन्या सभासदांचे वर्गणीचे तपशील संस्थेच्या **www.rayatshikshan.edu** वेबसाईटवर उपलब्ध करुन देत आहोत.

४) रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेचे सभासद होण्यासाठी प्रत्येक सेवकाचा स्वतंत्र सभासद अर्ज भरुन घेतला जाईल. सदरचा सभासद अर्ज सॉफ्ट व हार्ड कॉपी स्वरुपात मा. चेअरमन, रयत सेवक कुटुंब कल्याण योजना यांचेकडे पाठवायचा आहे. अर्जाचा नमुना या परिपत्रकासोबत उपलब्ध करुन देत आहोत. प्रत्येक सभासदाने अर्ज स्वतंत्रपणे भरून शाखेमार्फत पोष्टाने ऑफ़िसकडे पाठविणे गरजेचे आहे.

५) रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेचे सभासद होण्यासाठी प्रत्येक सेवकाने अर्जामध्ये सभासदाचे संपूर्ण नाव, रयत बँक सभासद नंबर, HRMS NO, मोबाईल क्र., सध्याचा पत्ता इ. लिहावे. शाखेतील अशा सभासदांची यादी दोन प्रतीत करुन त्या यादीसह वर उल्लेख केल्याप्रमाणे वर्गणी चेक ने पाठवावी.

६) सुधारित योजनेचे सभासदत्व स्वीकारतेवेळी सेवकाचे वय जे ५८ व्या अथवा ६० व्या वर्षी सेवानिवृत्त होणार आहेत त्यांच्या बाबतीत अनुक्रमे ४८ वा ५० वर्षापेक्षा अधिक नसावे फक्त योजनेतील जुन्या सभासदासाठी सेवकाचे वय अनुक्रमे ५६ वा ५८ वर्षापेक्षा अधिक नसावे.

७) सुधारित योजनेच्या सभासदत्वासाठी प्रवेश फी रु. १००/- असून वर्गणी किमान हप्ता १,०००/- राहील. ज्या दिवशी सेवकाची सदर रक्कम रु.१,१००/- (१००+१,०००) व योजनेचा पूर्ण भरलेला अर्ज रयत सेवक योजनेकडे जमा होईल त्या तारखेपासून त्या सेवकास या योजनेचे सभासदत्व प्राप्त होईल. या योजनेचे जे जुने सभासद आहेत त्यानासुद्धा १००रु. प्रवेश फ़ी आहे. सदर सेवकाने योजनेची वर्गणी जास्तीत जास्त पाच समान हप्त्यात पूर्ण करावयाची आहे. सुधारित योजनेची प्रवेश फ़ी रु. १०० व वर्गणीचा पहिला हप्ता कमान रु. १००० व योजनेचा पूर्ण भरलेला अर्ज योजनेकडे प्राप्त होताच सेवकाला कुटुंब कल्याण योजनेचा स्वतंत्र सभासद नंबर देऊन तो (sms अथवा Email ने ) शाखेकडे कळविला जाईल.

८) रयत शिक्षण संस्थेतून सेवानिवृती झाल्यानंतर रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची बोनसह वर्गणी मिळण्यासाठी सभासदाने आपल्या अर्जामध्ये संपूर्ण नाव, शाखा, HRMS NO, सेवानिवृत्तीची तारीख, रयत बँकेतील सेव्हिंग्ज ठेव क्रमांक, मोबाईल क्र., सध्याचा पत्ता इ. माहिती काळजीपूर्वक लिहावी तसेच शाखेतील व्हौचरवर सही करुन ते व्हौचर व अर्ज रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेकडे पाठवावा.

९) रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेचा पत्रव्यवहारांचा पत्ता,मेल आयडी, फ़ोन नंबर खालील प्रमाणे. मा. चेअरमन, रयत सेवक कुटुंब कल्याण योजना, रयत शिक्षण संस्था, सातारा. ४१५००१ ई-मेल- account@rayatshikshan.edu फ़ोन नं. ०२१६२-२३४५६६

**योजनेचे फायदे -**

१) सुधारित योजनेनुसार निधन पावलेल्या सभासदाच्या वारसास **रु. एक लाख** आकस्मिक सहाय्य निधी देण्याची भरीव तरतूद केलेली आहे. पूर्वी हा निधी रु. तीस हजार देण्यात येत होता.

२) सेवानिवृत्त / संस्था सोडलेल्या सभासदांना त्यांची योजनेकडे जमा झालेली (रु. ५०००/- वर्गणी पूर्ण झालेल्या सभासदांनाच) वर्गणी व खालीलप्रमाणे बोनस रक्कम त्याच्या सुधारित योजनेच्या सेवाकालावधीनुसार देण्यात येईल.

१) पाच वर्षापर्यंत सभासदत्व असणारे सभासद - रु. एक हजार
२) दहा वर्षापर्यंत सभासदत्व असणारे सभासद - रु. दोन हजार
३) दहा वर्षापेक्षा अधिक काळ सभासदत्व असणारे सभासद - रु. पाच हजार

तरी आपण आपल्या शाखेतील सर्व सेवकांना या सुधारित योजनेचे स्वरुप निदर्शनास आणून त्याचे महत्त्व विषद करावे. **आपल्या शाखेतील सर्व कायम सेवक** सदर योजनेचे सभासद होतील यादृष्टीने नियोजन करावे. हे परिपत्रक आपल्या शाखेतील सर्व सेवकांना निदर्शनास आणून परिपत्रक वाचल्याबद्दल त्यांच्या स्वतंत्र कागदावर सह्या घ्याव्यात. सदर योजनेच्या पत्रव्यवहारासंदर्भात आपल्या शाखेमध्ये रयत सेवक कुटुंब कल्याण योजनेची स्वतंत्र फ़ाईल ठेवावी.

सचिव
रयत शिक्षण संस्था,सातारा